# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त यांच्या उपस्थितीत १६ फायर बाईकचे करण्यात आले उद्घाटन**
- **मिरा भाईंदर महानगरपालिका अग्निशमन विभागाचे सक्षमतेकडे उचलले एक पाऊल**

दिनांक १० नोव्हेंबर २०२३ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या प्रमुख उपस्थितीत अग्निशमन विभागाकरीता खरेदी केलेल्या १६ फायर बाईकचे उद्घाटन करण्यात आले. सदर प्रसंगी अति. आयुक्त अनिकेत मानोरकर, उपायुक्त (अग्निशमन विभाग, मुख्यालय) मारुती गायकवाड, उपायुक्त कल्पिता पिंपळे, अग्निशमन विभाग अधिकारी प्रकाश बोराडे, महापालिका अधिकारी, व अग्निशमन विभाग कर्मचारी उपस्थित होते.

३५० सीसी क्षमतेचे इंजिन असलेले १६ फायर बाईक खरेदी करून अग्निशमन विभागाने सक्षमतेकडे एक पाऊल उचलले आहे. या फायर बाईक वर प्रत्येकी ३५ लिटरचा पाण्याचा साठा असणार आहे. बाईक वर वॉटर मिस्ट टेक्नॉलॉजी बसविण्यात आले असून या टेक्नॉलॉजी द्वारे हवा थंड करून आग विझविण्यात मोठ्या प्रमाणात मदत होणार आहे. बाईक वर नोझल गन सह २० मीटर लांबीचे होज रील उपलब्ध आहे तसेच जेट ची लांबी ही १० मीटर लांब ठेवण्यात आली आहे. यामध्ये अतिउच्च दाब देण्यात आल्याने पंपाची वॉटर डिस्चार्ज कॅपॅसिटी ८ ते ९ लिटर प्रति मिनिट असणार आहे. सदर फायर बाईकचा वापर हा लहान आणि प्राथमिक टप्प्यातील आग विझविण्यात येणार आहे. तसेच या बाईकच्या मदतीने वर्दळीच्या व गल्लीबोळात घटनास्थळी वेळेत पोहोचणे शक्य होऊन अग्निशमन सेवा लवकर पुरवण्यात मोठ्या प्रमाणात मदत होणार आहे असे मत मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी व्यक्त केले.

10/11/2023